**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**सार्वजनिक आरोग्य खाते**
**कस्तुरबा रुग्णालय**

क्र.एचओ/ 3259 / केएच दि. 21.07.2025

**शुध्दीपत्रक**

**<u>जाहिरात</u>**

कस्तुरबा रुग्णालयाच्या आस्थापनेवर 06 एम.बी.बी.एस. अर्हता धारक वैद्यकीय अधिकारी यांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्याकरीता मा. महानगरपालिका आयुक्त यांची क्र. एमजीसी / एफ / 6962 दि. 25.06.2025 अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. यास्तव, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर / कस्तुरबा रुग्णालयाच्या कार्यालयातील सूचना फलकावर प्रस्तुत जाहीरातीत नमूद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता / पात्रता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

पूर्ण भरलेला अर्ज सोबत शैक्षणिक अर्हतेची सर्व कागदपत्रे जोडून दि.16.07.2025 ते दि. 31.07.2025 पर्यत कार्यालयीन वेळेत (सर्व शनिवार तसेच रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी 11:00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यत भरून, कस्तुरबा रुग्णालय यांच्या आवक- जावक विभागात सादर करावा.

अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवारांनी स्वतः खात्री करावयाची आहे की, ते अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहीत अर्हता / अटींची पूर्तता करीत असून सदर कंत्राटी पदाकरीता ते पात्र आहेत. उमेदवाराच्या अर्जात नित्य वापरात असलेला वैध (valid) ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे.

**कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदाचा तपशील खालीलप्रमाणे-**

**कंत्राट कालावधी** : दि. 16.08.2025 ते 31.03.2027

| अ. क्र. | पदाचे नाव व वर्ग | एकूण पदे | मासिक मानधन | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| | वैद्यकीय अधिकारी<br>वर्ग-ब | 06 | 90,000/- | 1.उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी धारण करणारा आसावा.<br>2.उमेदवार100 गुणांचा मराठी विषय घेवून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत उत्तीर्ण असावा.<br>3. सदर उमेदवारास एच एम आय एस (HMIS) संगणकीय प्रणालीमध्ये (जेथे उपलब्ध आहे तेथे) रुग्णांची माहिती स्वत: भरावी लागेल त्यादृष्टीने आवश्यक ते संगणक वापराचे कौशल्य असावे.<br>4.उमेदवार 'महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलशी 'नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. |

**निवडीचे निकष व कार्यपध्दतीः**

1. सदर पदाची विहित केलेली शैक्षणिक अर्हता गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीतील उमेदवारामधून निवड यादी तयार करण्यात येईल.
2. अर्ज करण्याचा कालावधी : दि.17.07.2025 ते दि. 31.07.2025

**सर्वसाधारण अटी:**

1) उमेदवाराचा भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी अणि पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा.

2) पात्र उमेदवारांना कंत्राटी नियुक्ती देण्यापूर्वी संबंधीत पोलीस ठाण्याकडून उमेदवाराचे चारित्र्य व पूर्वचारित्र

प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

3) कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येणा-या ठोक मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.

4) उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसे नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.

5) उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अधःपतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/न्यायालयिन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.

6) त्यांच्या कंत्राटी सेवेच्या कालावधीमध्ये दर 179 दिवसानंतर 01 दिवसाचा सेवा खंड देण्यात येईल.

7) उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील सत्रांनुसार साप्ताहिक रजा व सहा महिन्याच्या कालावधीकरीता 07 नैमित्तिक रजा अनुज्ञेय असेल, **त्या व्यतिरिक्त इतर कोणतीही रजा अनुज्ञेय नाही.**

8) कंत्राटी कालावधीत त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्याचे अधिकार वैद्यकीय अधिक्षक कस्तुरबा रुग्णालय यांच्याकडे राहतील.

9) त्यांची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

10) नियुक्तीचे वेळी उमेदवाराकडून रु. 500/- च्या बाँड पेपरवर करारनामा करुन घेण्यात येईल.

11) त्यांची विना परवानगी गैरहजेरी विनावेतनी गैरहजेरी (LWP) करण्यात येईल.

12) उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अधःपतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/न्यायालयिन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.

13) सदर कंत्राटी तत्त्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रदद करण्यांत येईल.

14) कोणत्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 15 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.

15) नियुक्त झालेल्या उमेदवारास महानगरपालिकेमध्ये कायमस्वरुपी सेवेसाठी कोणताही हक्क सांगता येणार नाही. तसेच त्यांना नियमित सेवेचे कोणतेही फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.

16) निवडप्रकिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रददबातल करण्यांत येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल.

17) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवडप्रकिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार वैद्यकीय अधिक्षक, कस्तुरबा रुग्णालय यांना आहे.

18) वरिष्ठांच्या आदेशानुसार चक्रांकीत पद्धतीने काम करावे लागेल.

**विशेषसूचना :**

1) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

2) टपालाने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

- -सही - -

**वैद्यकीय अधिक्षक, कस्तुरबा रुग्णालय**